**नि.फौ.ख.क्र.४५/२०१९**

**शासन वि. इजाज अहमद**

**नि.क्र. ६४**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.६</u>**

नावः मोहम्मद युसुफ अब्दुल्ला खान,

वयः ५० वर्ष, धंदाः खाजगी,

पत्ताः कामठी , जि. नागपूर

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र ६ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस. व्ही. तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः</u>**

**१.** मी आरोपी क्र. १ व २ यांना ओळखतो. मी फिर्यादी व साक्षीदार क्र. ३ यांना ओळखतो. ते माझ्या मोहल्ल्यात राहतात. घटना डोरली गावात घडली. घटना दि. २८/०१/२०१४ रोजीची आहे. मला माझा मित्र मोहम्मद नईम पटेल यांचा फोन आला व त्याने सांगितले की, इजाज व तारीक यांनी सलिम पटेल व नईम पटेल यांच्या शेतातील डोरली येथील झाडे कापली. त्यानंतर आम्ही त्या ठिकाणी गेलो. माझ्या सोबत मोहम्मद रफिक, मोहम्मद शरीफ हे होते. त्या ठिकाणी आम्हाला झाडे कापलेली दिसली. नईम पटेल व सलिम पटेल यांनी इजाज व तारीक यांना झाडे कापण्यास मनाई केली. त्याचे कारण नईम पटेल व सलिम पटेल यांची मालमत्तेमधील झाडे होती. इजाज व तारीक म्हणत होता की, मालमत्ता आमची आहे. त्यानंतर नईम पटेल व सलिम पटेल यांनी तक्रार दिली. घटनेच्या ठिकाणी वादावाद झाला होता. पोलिसांनी माझे बयाण नोंदविले.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपी क्र.१ तर्फे श्री एन. एस. वासनिक वकील साहेब यांच्यामर्फत उलटतपास शपथेवर सुरुः–</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ व २ हे साक्षीदार क्र. ३ राशिद पटेल यांचे जावई आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी इजाज अहमद याची पत्नी कमरजहा हिला ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. २ याच्या पत्नीला ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, साक्षदार क्र. ३ कमरजहा व नसरिम परवेज यांचे चाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, डोरली येथील मालमत्ता वडीलोपार्जीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, कमरजहा व नसरिम यांचे सुध्दा त्या मालमत्तेत हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, नईम पटेल हा माझा चांगला मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की रशीद पटेल हा नईम पटेलचा मोठा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, नईम पटेल आज न्यायालय परिसरात हजर आहे. हे म्हणणे खरे नाही की, नईम पटेल व रशिद पटेल यांनी मला न्यायालयात साक्ष देण्यास सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझे बयान २०१४ साली नोंदविले. असे झाले नाही की, माझे बयाण घटणेनंतर दोन–तीन वर्षांनंतर नोदविले.

नईम पटेल यांचा फोन किती वाजता आला हे सांगू शकत नाही. मी अंदाजे १२.०० वाजता घटनास्थळावर पोहोचलो. मी घटनास्थाळाच्या चर्तुःसिमा सांगू शकत नाही. मी शेतात त्यावेळेस कोणते पीक होते ते सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थाळावर गेलोच नाही त्याकारणाणे घटनास्थाच्या चर्तुःसिमा सांगू शकत नाही. साक्षदार स्वतःहून सांगतो की घटनेला बरीच वर्ष झाली असल्यामुळे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, एजाज व तारीक अहमद यांना झाडे कापतांना पाहीले हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे मला माहीत नाही की आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये मालमत्तेवरुन वाद

आहे.हे म्हणणे खरे नाही की, रशीद पटेल व नईम पटेल यांच्यासांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र. २ तर्फे आरोपी क्र. १ ने घेतलेला उलटतपास स्विकारला.**

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत, | समक्ष, |
| GAJENDRA ONKARRAO WANKHADE — Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2025.07.15 17:08:32 +0530 | GAJENDRA ONKARRAO WANKHADE — Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2025.07.15 17:08:39 +0530 |
| **(जी.ओ. वानखडे)** | **(जी.ओ. वानखडे)** |
| न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी | न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी |

दिनांकः १५/०७/२०२५